# मराठा आरक्षण आणि उच्च जात वर्चस्वाचे राजकारण

| **प्रस्तुत लेख पुढील मुद्यांचा वेध घेतो.** |
| --- |
| **१. सामाजिक राजकीयदृष्ट्या ग्रमीण महाराष्ट्रात 'मराठा जात' वर्चस्व स्थानावर आहे. परंतु शेती-अर्थव्यवस्थेतील पेचप्रसंगामुळे मराठ्यांच्या आर्थिक-सामाजिक स्थानाला धक्के बसत आहेत.** |
| **२. मराठा आरक्षणाची मागणी मराठ्यांतील उच्चभ्रूवर्गाकडून होणारे सामान्य मराठ्यांचे शोषन लपविते. सत्ता व संपत्तीने संपन्न उच्चभ्रू व त्यांच्याकडून पिळला जाणारा बहुसंख्यांकांचा शोषित वर्ग या दोहोत संघर्ष आहे. मराठ्यांतील या अंतर्गत संघर्षाला आरक्षण मागणी चर्चाविश्वाच्या बाहेर ठेवते.** |
| **३. आरक्षणासाठीच्या आंदोलनाद्वारे 'कुणबीं'चे मराठाकरण करणे मराठा सत्ताधिशांना शक्य होणार आहे. 'मराठा' नेतृत्वाच्या कक्षेचा संख्यात्मक विस्तार आणि त्याद्वारे मराठा सम्राटांच्या राजकीय आधारांचे बळकटीकरण अशा दिशेने हे आंदोलन गतीशील राहील.** |
| **४. मराठा जातीतील श्रमिक स्त्री-परुषांच्या सहभागावर उभ्या जातीस्त्रीदास्यविरोधी चळवळीच ग्रामीण राजकारणाच्या जातीकरणाचा प्रतिकार करु शकतील.** |

मराठा आरक्षणाच्या मागणीला उच्च जात वर्चस्वाच्या राजकारणाची एक गंभीर बाजू आहे. मराठा आरक्षणाच्या आजवरच्या चर्चेत ती मूलभूतपणे समोर आलेली नाही. भारतीय समाज हा जातीव्यवस्थाक उतरंडीवर उभा राहीलेला समाज आहे. या उतरंडीत प्रत्येक जातीला इतर कोणत्यातरी जातीपेक्षा वरचं स्थान असल्याने प्रत्येक जात ते टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आली आहे. उतरंडीच्या या वैशिष्ट्यामूळेच ती आजही टिकून राहीलेली आहे. एवढेच नाही तर या उतरंडीत अधिक वरचे स्थान मिळविण्याचाही प्रयत्न इतिहासात झालेला दिसतो. त्यासाठी आपल्यापेक्षा उच्च जातींनी स्विकारलेली मूल्ये, विचार, जीवनपध्दती, त्यांची संस्कृती स्विकारण्याचा व काटेकोरपणे पाळण्याचा प्रयत्नही जातीजातींमध्ये झालेला दिसतो.

मराठा आरक्षणाची मागणी वरवर पाहता मराठ्यांना शुद्रत्वाकडे घेऊन जाणारी आहे असे दिसत असले तरी खऱ्या अर्थाने ती तशी नाही. आम्हीही शुद्र आहोत असे म्हटल्याने केवळ शुद्रत्व ठरवता येत नाही. कार्ल मार्क्सने म्हटल्याप्रमाणे श्रमिक वर्गाच्या हिताचा संघर्ष करतांना 'डी क्लास' व्हाव लागतं. त्याच पध्दतीने फुले आणि बाबासाहेबांचा जातीसंस्थेविरुध्दचा संघर्ष 'डी कास्ट' होण्याचाच संदेश देतो. हे सांगण्याचा उद्देश एवढाच की भारतीय संर्दभात आरक्षण हे जातीव्यवस्थेच्या विरोधात समान संधी व सामाजिक न्याय प्रस्थापीत करण्याच्या प्रक्रियेतील एक साधन आहे. (ते अंतीम मात्र नाही हे ही लक्षात ठेवावे लागेल.) आरक्षणाचं समर्थन करतांना आम्ही शुद्र आहोत असा जो युक्तिवाद मराठ्यांकडून केला जातो त्यातून ते जातीव्यवस्थेचाही काही विचार करीत आहे असा समज पसरविण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. मात्र मराठ्यांचं हे शुद्रत्व फुले बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे 'डी कास्ट' होण्याच्या संर्दभात तपासायला हवे. डी कास्ट होण्याचा थोडक्यात अर्थ असा की शुद्र जातींच्या उन्नतीच्या प्रेरणा, मुल्ये, प्रतिके यांच्याशी एकरूप होणं. शुद्र जातींना होणारा आनंद, दु:ख हे आपलं वाटणं म्हणजे डी

कास्ट होणं. आणि त्यामूळेच डी कास्ट होण्याची सामूहीक प्रक्रिया ही सहज सोपी नाही. अनेक वर्षांच्या सामूहिक संघर्षातूनच तिचा विकास होण्याच्या शक्यता निर्माण होतात. मराठ्यांमध्ये जातिव्यवस्थेविरुध्दचा असा कोणता मोठा संघर्ष झाला ज्यातून मराठ्यांना समूह म्हणून डी कास्ट होण्याची संधी मिळाली आहे? हा खरं तर संशोधनाचाच विषय आहे. मराठ्यांचे आजचे सामाजिक आर्थिक राजकीय स्थानही मराठ्यांच्या शुद्रत्वाला आव्हानच देते. त्यामूळे मराठा आरक्षणाची मागणी कोणत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीतून पूढे आली आहे, याचा विचार एकूणच मराठ्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थानासंदर्भात करावा लागेल.

**मराठ्यांचे सामाजिक - सांस्कृतिक स्थान :**

मराठा समाज हा संपूर्णत: सामाजिक आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसला तरी त्यातील कोणताही समूह स्वत:ला शुद्र म्हणून घेत नाही किंवा दलित जातींच्या तूलनेत त्यांच्याशी शुद्रत्वाचा व्यवहार केला जात नाही. गावातील सामाजिक सांस्कृतिक रचनेत तो मानाने मिरवत असतो.प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या लग्न, हुंडा, मानपान, सत्यनारायण यासारख्या पूजा, गृहप्रवेश यासारख्या परंपरा प्रसंगी कर्ज काढून, ऊसनवारी करुन दिमाखात साजऱ्या करण्याचा आटोकाट प्रयत्न तो करतो. एवढेच नाही तर ब्राह्मणांच्या दर्जाचं श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी अनेक धार्मिक विधी कोणताही आशय, भाषा न बदलता ब्राह्मणांशिवाय स्वत:च करण्यामध्ये तो स्वत:ला श्रेष्ठ व धन्य मानतो आहे. त्यामूळे सामाजिक दृष्ट्या मराठ्यांचे स्थान मानाचे व वर्चस्वाचे आहे.बदलत्या अर्थकारणात ते अधिक घट्ट करण्याचाही प्रयत्न होत आहे.

**मराठ्यांचे आर्थिक स्थान:**

महाराष्ट्रात आज अनेक आमदार, खासदार, शिक्षण सम्राट, सहकार सम्राट, साखर सम्राट यामध्ये प्रामूख्याने मराठेच आहेत. त्यामूळे त्यांची आर्थिक स्थिती सामान्य मराठ्यांच्या स्वप्नांच्याही पलिकडची आहे. सामान्य मराठा मोठ्या प्रमाणात दोन वेळच्या जेवणासाठीचा संघर्ष करीत आहे. मात्र नव्या जागतिक शेती अर्थकारणात शेतीतून आर्थिक लाभ होणं तर दुरच शेतीच्या बदललेल्या या चक्रात तो कर्जबाजारी झाला आहे. नव्या शेती धोरणाचा व त्याच्या परिणामांचा ऊहापोह करणे येथील चर्चेचा विषय नाही. मात्र शेतीतून आलेलं अपयश मराठ्यांच्या आर्थिक सामाजिक स्थानावर परिणाम करीत आहे. जातीव्यवस्थेतून आलेलं सामाजिक वर्चस्व व पारंपारीक जमिन मालकी यातून निर्माण झालेलं आर्थिक नेतृत्वाचं स्थान यातून मराठा जात अगदी इतिहास काळापासूनच 'वरचढ शेतकरी जात' म्हणून सामाजिक नेतृत्वस्थानी राहीलेली आहे. नव्या अर्थकारणाने हे स्थान डळडमळीत केले आहे. शेतमजूर, दलित जाती तर मोठ्या प्रमाणात महानगरांकडे स्थलांतरीत झाल्या आहेत. मराठा तरुणांची नवी पिढी तर मोठ्या प्रमाणात 'नौकऱ्याच नाहीत तर शिकून काय करायचे' असे म्हणत जेमतेम पदवीपर्यंतच्या शिक्षणानंतर अतिशय नैराश्येने शिक्षणातून बाहेर पडत आहेत. मात्र नौकऱ्या व नव्या अर्थकारणाचा सहसंबंध समजून घ्यायची त्यांची तयारी व मानसिकताही राहीलेली नाही. मग या एकांगी नैराश्येची भर व सामाजिक वर्चस्वाची वृत्ती टिकवून ठेवण्यासाठी तो आरक्षणाला विरोध, दलित विरोध अशा कार्यक्रमांच नेतृत्व करायला सरसावला आहे. वेगवेगळ्या बाबा-बुवा यांचं झपाट्यानं वाढत जाणारं प्रस्थ हे या तारुण्याच्याच दिशाहिनतेचा अविष्कार आहे. नौकरीविना, व्यवसायाविना स्वत्व हरवून बसलेले हे तरुण म्हणूनच वेगवेगळ्या तथाकथीत धार्मिक कार्यात स्वत:ला झोकून देवून स्वत:ची ओळख व अस्तित्व शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठीच धार्मिक-सांस्कृतिक दृष्ट्या ते अतिशय कट्टर व तेवढेच हिंसक बनू पाहत आहे.

**मराठ्यांचे राजकीय स्थान:**

मराठा आरक्षणाची व समर्थनाची मागणी ही केवळ एक राजकीय खेळी आहे व निवडणुका डोळ्यांसमोर ठेवूनच ती खेळली जात आहे' असा सरळ आरोप करुन या मागणीचे राजकीय विश्लेषण देता येत नाही. मराठा आरक्षणाच्या निमित्ताने भारतीय सत्ताकारणाचाही विचार करावा लागेल. निदान सत्ताधारी वर्गाचे स्वरुप तरी समजून घ्यावे लागेल. भारतीय सत्ताकारणाचे ठळकपणे दोन वैशिष्ट्ये आपल्याला दिसतात. एक म्हणजे गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंतचा सत्ताधारी वर्ग हा एका विशिष्ट सामाजिक रचनेतून बनलेला आहे. या सत्ताधारी वर्गात प्रमख केंद्रस्थानी आहेत त्या उच्च व व्यापारी जाती. त्यांच्यात दुय्यम भागीदार म्हणून सहभागी झालेल्या आहेत त्या वरचढ शेतकरी जाती किंवा त्यांतील टगे व 'तिसऱ्या दर्जाचे आश्रीत भागीदार' म्हणून दलित कष्टकरी जातींतील नवश्रीमंतांना सहभाग दिला आहे. अशा पध्दतीने भारतीय सत्ताधारी वर्गाचे स्वरुप 'बहुस्तरसत्ताक' असे आहे. या बहुस्तरसत्ताक रचनेमूळेच समाजातील सर्वच समाजघटकांवर अनियंत्रीत अशी सत्ता प्रस्थापीत करण्यात व त्यांच्यावर अंकूश ठेवण्यात सत्ताधारी वर्ग यशस्वी झालेला आहे. महाराष्ट्रातील मराठा या सत्तारचनेत दुय्यम भागीदार म्हणून सहभागी झालेला आहे. राज्यस्तरीय सत्तारचनेत मराठा श्रेष्ठी वर्ग केंद्रस्थानी असतो. राज्यस्तरीय साधनसंपत्तीच्या नियंत्रनाचा विचार केला तर 'मराठा' ही प्रभुत्वशाली जात म्हणून निर्देशित केली जाते. ३५% च्या आसपास संख्यात्मक ताकद, जमीनमालकीचे इतर जातींच्या मालकीच्या तुलनेत अधिक प्रमाण आणि परंपरेने प्राप्त झालेले राजकीय नेतृत्व या सर्वांच्या परिणामी 'मराठा जात' ही प्रभुत्वशाली जात ठरते. इतर कोणत्याही राज्यात एक शेतकरी जात असे स्थान प्राप्त करु शकलेली नाही. परिणामी तेथे स्वातंत्र्योत्तर कालखंडात उच्च जातवर्गीय सत्ता साकार झाली, शेतकरी जातींच्या उच्चभ्रुंची नाही.महाराष्ट्रात मात्र संख्यात्मक सामर्थ्य निवडणुकीच्या राजकारणात महत्वाचे ठरले, त्याचबरोबर जमीनमालकी आणि सत्तापरंपरेचा वारसा या प्रकारच्या राजकीय वारशामुळे मराठ्यांतील काही गट सतत स्वत:चे सत्तेपासूनचे अंतर भरुन काढण्यासाठी मराठा जातीय अस्मितेचा वापर करीत आलेले आहेत. आजच्या मराठा आरक्षणामागे हीच राजकीय प्रेरणा आणि सत्तास्पर्धेसाठीचा इतिहास उभा आहे.

मराठ्यांतील उच्चभ्रू वर्ग राजकीय सत्ता संपादनात यशस्वी होत असला तरी मराठ्यांतील छोटे शेतकरी, बेरोजगार तरुण आणि स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सत्तेच्या परिघाबाहेर ठेवले जातात. 'घराणेशाहीकेंद्री' राजकारणामुळे सत्ता व साधनसंपत्ती यांचे वितरण बहुसंख्यांक असलेल्या 'मराठा' स्त्री-पुरुषांपर्यंत होतच नाही.

या राजकारणाचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे वरवर हे राजकारण कितीही पक्षीय दिसत असलं तरी ते पक्षीय राहीलेलं नाही. कमी अधिक प्रमाणात सर्वच राजकीय पक्षांमध्ये वेगवेगळ्या प्रस्थापीत घराण्यांचा प्रभाव वाढलेला आहे. ही घराणे म्हणजे नवे 'राजकीय संस्थानिकच' होय. या सर्व संस्थानिक घराण्यांनी सामान्य व सत्ताकांक्षी मराठ्यांचा राजकारणातील प्रवेश पूर्णपणे थांबविला आहे. गावापासून ते राज्यापर्यंत अशाच पध्दतीची राजकीय रचना कार्यरत आहे. त्यामूळेच या नव्या सत्ताकांक्षी गटांकडून अशा मागण्या पूढे आणल्या जात आहे ज्या या सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीवर सामान्य मराठा समूहाला प्रभावित करु शकतील. मात्र एका बाजूला अशा मागण्या करुन सत्ताधाऱ्यांच्या विरोधी संघर्षात आम्ही आहोत असा आभास निर्माण करायचा व त्याचवेळेस या सत्ताधारी संस्थानिक घराण्यांचे आश्रीत म्हणून सत्तेत कूठेतरी वाटा मिळवायचा अशी दुहेरी व दूतोंडी भूमीका आरक्षण मागणारे व मराठा प्रेमाचा दावा करणारे पार पाडीत आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्यांची सामाजिक राजकीय नैतिकताही किती ढोंगी आहे हे ही तपासायला हवे.

या सर्व पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाची मागणी कोणते कार्य पार पाडते याचाही विचार करायला हवा.

**मराठा आरक्षणाची मागणी उच्चभ्रू मराठ्यांकडूनच होणारे सामान्य मराठ्यांचे शोषण लपविते. अर्थात मराठ्यांमधील अंतर्गत शोषण- शासन संबंधाच्या चर्चेला एकूणच चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी येवू देत नाही.**

आधीच सांगितल्याप्रमाणे मराठ्यांमध्ये एका बाजूला वेगवेगळ्या सम्राटांचा एक मराठा गट व दूसऱ्या बाजूला सामान्य व गरीब मराठ्यांचा मोठा समूह अशी स्पष्ट वर्गीय विभागणी मराठ्यांमध्ये झालेली दिसते. मराठा आरक्षणाची मागणी ही वर्गीय भेदरेषाच पूसून टाकते. मराठ्यांमधला सम्राटांचा हा वर्ग वेगवेगळ्या सहकारी सोसायट्या, कृषी उत्पन्न बाजार समित्या, पाणी वापर सोसायट्या यांपासून ते शेती औजारं, बी-बीयाणे व रासायनिक खतांचे व्यापारी, कापूस खरेदी करणारे व्यापारी, किराणा दुकानदार व खासगी सावकार यांपर्यंत सर्व जन सामान्य शेतकरीरूपी मराठ्यांना लूटत असतात. उदाहरण द्यायचे झाल्यास सामान्य मराठा शेतकऱ्याकडे पाऊस पडल्यानंतर बी-बियाणे खते विकत घ्यायला अनेक वेळेस पैसेच नसतात. अशा वेळी तो आपल्याच गावात असलेल्या मराठा व्यापाऱ्याकडून/ दुकानदाराकडून या सर्व वस्तू उधारीवर खरेदी करतो. बोली असते उत्पन्न आल्यावर ते त्यालाच विकायचे. शिवाय या कालखंडादरम्यान उधारीच्या पैशावर व्याजही त्याच्याच मर्जिने. शेवटी उत्पन्न आलं की भाव काय द्यायचा हे ही तोच ठरवतो. अशा परिस्थितीत सामान्य मराठ्याच्या हातात काय येत असेल हे शेतकरी आत्महत्यांनी दाखवून दिले आहे. मराठा आरक्षणाची मागणी अशा पध्दतीने मराठ्यांना समान दर्जा प्रदान करते व मराठ्यांमधील हा अंतर्विरोध व शोषण संबंध लपविण्याचे महत्वाचे कार्य पार पाडते. त्यामूळे वरचढ मराठे सामान्य मराठ्यांचे क्रूर शोषण करुनही 'मराठा' या नावाखाली त्यांच्यावर सत्ता गाजवतात व त्यांचे सामाजिक सांस्कृतिक राजकीय आदर्श बनतात. सामान्य मराठा शेतकरीही मुलीचं लग्न थाटामाटात, झगमगाटात करू इच्छितो कारण त्याच्यासमोर त्याच्याच जातभाइने प्रचंड उधळपट्टी करून लावलेल्या लग्नाचा आदर्श असतो. हा आदर्श मग त्याच्या संपूर्ण सामाजिक- सांस्कृतिक जीवनातही कायम राहतो व त्यालाच तो बळी पडतो. पसंगी सम्राट जातभाईच्या राजकीय स्वार्थासाठीच तो मग दलित अत्याचारांचेही नेतृत्व करतो.

**मराठा आरक्षणाची मागणी मराठा जातीवर्चस्वाच्या राजकारणाला अधिक व्यापक सत्तास्वरुप प्रदान करते.**

मराठ्यांनी ओबीसी म्हणून आरक्षण मिळावे अशी मागणी केलेली आहे. त्यामूळेच अनेकांनी या प्रक्रियेला मराठ्यांचे ओबीसीकरण असे संबोधण्याचे धाडस केले आहे. हे खरचं मराठ्यांचे ओबीसीकरण आहे का? की आणखी काही? आरक्षणाची मागणी करणाऱ्यांच्या एकूणच वर्तमान प्रवृत्तीवरुन व प्रकृतीवरुन त्यांनी ही मागणी जातीव्यवस्था अंताचा काही विचार करून केली आहे असे कोणी म्हणनार नाही. कारण ती तशी नाही हे वर सिध्दच झालेले आहे. जातीव्यवस्थाक उतरंडीत आधीच सांगीतल्याप्रमाणे जातिनिहाय वरचा सामाजिक दर्जा मिळविण्यासाठी उच्च जातींचे मोठ्या प्रमाणात अनूकरण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. ओबीसी जातीदेखील याला अपवाद नाही. मराठा आरक्षणाच्या निमित्ताने वरवर पाहता हे मराठ्याचे ओबीसीकरण आहे असे वाटू शकते. मात्र हे ओबीसीकरण मराठ्यांच्या वर्चस्वाच्या सर्व संस्कृतीसहीत होत आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.एका बाजूला मराठ्यांना ओबीसी व्हायचे आहे व तेही आपल्या वर्चस्ववादी संस्कृतीबरोबर, तर दुसऱ्या बाजूला वरचा सामाजीक दर्जा प्राप्त करण्यासाठी मराठ्यांच्या संस्कृतीचं ओबीसींकडून होणारं अनूकरण यातून एक नविनच विस्तारीत जनसमूह विकसित होवू पाहत आहे. मराठे ओबीसीत जातील पण ते केवळ राजकीय परिभाषेतील ओबीसी म्हणून. त्यांची

संस्कृती ओबीसींना मराठेपणाची नवी ओळख देईल जी ओबीसींना उतरंडीच्या स्वाभाविक प्रक्रियेत हवीच आहे.

**मराठा म्हणून ओबीसी सवलती उपलब्ध झाल्यास त्यातून कोणत्या प्रक्रिया गतिमान होतील?**

---

१) कुणबींना प्राप्त होणाऱ्या आजच्या सवलतींच्या, आरक्षणाच्या संधीक्षेत्रात नव्या आरक्षणाच्या जोरावर 'मराठ्यां'मधील उच्चभ्र थर अधिकच वेगाने आणि व्यापकतेने प्रवेश करील. 'मराठा' वर्चस्वाचे आर्थिक व राजकीय आधार आजही राजकीय क्षेत्रात भक्कम आहेत. या आधारांना नव्या आरक्षण सुविधांमुळे अतिरिक्त शक्तीसामर्थ्य पुरविले जाईल. (मराठा वर्चस्वाचा विस्तार व खोली या दोन्हींबाबत आरक्षणामुळे बदल घडून येईल याची भीती ओबीसींमध्ये आहे. ती भीती दुर करण्यासाठी शरद पवार वारंवार आश्वासने देत आहेत की, मराठ्यांना राजकीय आरक्षण नको आहे!)

२) आज 'कुणबी' आणि 'मराठा' असे दोन जातीसमूह पृथकपणे कार्यरत आहेत. दोन्हींमध्ये सामाजिक आणि राजकीय दर्जांबाबत भेद आहेत. परंतु, 'मराठा' म्हणुनही ओबीसी सवलती मिळत असल्यामुळे जात्योन्नतीचा भाग म्हणून 'कुणबी' स्वत:ची वर्गवारी 'मराठा' म्हणून करतील. कुणबीतील श्रेष्ठी व मराठ्यांतील श्रेष्ठी 'मराठा' जात अस्मितेच्या व्यापक छत्राखाली कुणबी व मराठा यांच्यातील बहुजनांवर वर्चस्व गाजवतील. यामुळे कुणबींच्या मराठाकरणाची प्रक्रिया गतीशील राखली जाईल!

त्यातून खरं तर सामाजिक सांस्कृतिक अर्थाने काही ओबीसी हेच 'मराठे' बनतील. यातून मराठ्यांच्या वर्चस्वाच्या कक्षा जनविभागाच्या संदर्भात अधिकच रूंदावतील व त्याआधारे मराठा उच्च जात वर्चस्वाचे सरंजामी राजकारण अधिकच क्रूरपणे प्रस्थापित होईल. **त्यामूळे मराठा आरक्षण हे मराठ्यांचं ओबीसीकरण नसून ओबीसींचेच मराठाकरण आहे** असं म्हणावं लागेल. सतत आरक्षणविरोधी भूमिका घेणाऱ्या व त्यावरच आपले राजकारण रेटणाऱ्या जातीवर्चस्ववादी शक्तींनी मराठा आरक्षणाच्या विरोधात अजूनपर्यंत ठाम भूमिका का घेतलेली नाही या प्रश्नाचे उत्तरही याच जातीवर्चस्वाच्या राजकारणात दडलेलं आहे हे आता वेगळे सांगायची गरज नाही.

---

एकनाथ आर. ढोकळे,
पहिला मजला, लकी निवास,
म्हसोबा चौक, जिम्मी बाग,
कोळसेवाडी, कल्याण (पूर्व)
मो.९२२१६३७५५६.